**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक ०९ जानेवारी २०२५**

**ठळक बातम्या**

1. **भारतीय समुदाय जगभर उत्तम कामगिरी करत असून देशाला त्याचा अभिमान असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.**
2. **क्षयरोग निर्मूलन अभियानासंदर्भात केंद्रीय गृह मंत्रालयाची सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना पत्र.**
3. **वनक्षेत्राचा विकास आणि वन्य प्राण्यांचे संरक्षण याला राज्य सरकारची प्राथमिकता - राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांचे नागपुरात प्रतिपादन.**
4. **आदर्श आणि सुसंस्कृत समाज घडविण्यात महिलांचा मोठा वाटा- राज्यमंत्री पंकज भोयर यांचे वर्धा इथल्या महिला मेळाव्यात प्रतिपादन.**
5. **विदर्भ गारठला, ८.२ अंश सेल्सियस इतक्या किमान तापमानासह नागपूर ठरले सर्वात थंड.**

**-------------------------------**

**प्रवासी भारतीय**

**भारतीय समुदाय जगभर उत्तम कामगिरी करत असून देशालात्याचा अभिमान आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज ओदिशामध्ये भुवनेश्वर इथं १८ व्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाचं औपचारिक उद्घाटन करताना बोलत होते.भारत देशाने जगाला युद्ध नव्हे तर बुद्ध दिला आहे असे ते म्हणाले.**

***दुनिया में जब तलवार के जोर पर साम्राज्य बढ़ाने का दौर था, तब हमारे सम्राट अशोक ने यहाँ शांति का रास्ता चुना था हमारी इस विरासत का ये वही बल है जिसकी प्रेरणा से आज भारत दुनिया को कह पाता है,की भविष्य युद्ध में नहीं है बुद्ध में है /***

**प्रवासी भारतीय दिवस संमेलन, हा केंद्रसरकारचा महत्त्वाकांक्षीकार्यक्रम, परदेशात स्थायिक झालेल्या भारतीय समुदायाला परस्परांच्यासंपर्कात येऊन संवाद साधण्यासाठी महत्त्वाचं व्यासपीठ प्रदान करतो. भारतीय समुदायाच्या पर्यटनासाठी खास तयार करण्यात आलेल्या 'प्रवासी भारतीय एक्स्प्रेस'ला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज दृक्श्राव्य माध्यमातून हिरवा झेंडा**

दाखवला. युवा प्रवासी भारतीय दिनाच्या उद्घाटना बरोबर कालपासून प्रवासी भारतीय दिन सोहळ्याला सुरुवात झाली. 'परदेशस्थ भारतीयांचं विकसित भारतासाठी योगदान', ही यंदाच्या तीन दिवसीय प्रवासी भारतीय दिवस सोहळ्याची संकल्पना आहे. विविध देशांमधल्या भारतीय समुदायाचे सदस्य मोठ्या संख्येनं या संमेलनाला उपस्थितआहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाच्या समारोप समारंभाला उपस्थित राहणार आहेत. यावेळी त्या परदेशस्थ भारतीय समुदायाच्या सदस्यांना विविध क्षेत्रातल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल 'राष्ट्रपतीप्रवासी भारतीय सन्मान' प्रदान करतील.

------------------------------

इस्रो

भारतीय अंतराळ संशोधन संस्था -इस्रोनं स्पेडेक्स मोहिमेच्या अंतर्गत पृथ्वीच्या जवळच्या कक्षेत फिरणाऱ्या दोन उपग्रहांचं डॉकिंग म्हणजे जोडणीचा प्रयोग लांबणीवर टाकला आहे. दोन उपग्रहांमधलं अंतर जास्त वाढल्यामुळे हा प्रयोग पुढे ढकलावा लागल्याचं इस्रोनं स्पष्ट केलं आहे. इस्रोनं यापूर्वी हा प्रयोग सात जानेवारीला घेण्याचं जाहीर केलं होतं, मात्र तेव्हाही या वाढलेल्या अंतरामुळे तो पुढे ढकलून आज घेण्याचं जाहीर करण्यात आलं होतं. आता पुढचा प्रयोग कधी होईल हे लवकरच जाहीर केलं जाईल असं इस्रोनं म्हटलं आहे.

------------------------------

क्षयरोग निर्मूलन

देशभरात सुरू असलेल्या क्षयरोग निर्मूलन अभियाना संदर्भात केंद्रीय गृह मंत्रालयाने सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना पत्र लिहिलं आहे. देशातून क्षयरोगाचं समूळ उच्चाटन व्हावं यासाठी केंद्र सरकार वचनबद्ध असून या अभियानात राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांनीही सहभागी व्हावं असं आवाहन या पत्रातून केंद्राने केलं आहे. सर्व कारागृहं तसंच सुधारगृहांमध्ये १०० दिवसांच्याया अभियानाचं आयोजन करण्यात यावं, असे निर्देशही या पत्रात दिले आहेत. कारागृहांची रचना आणि त्यात असलेली कैद्यांची संख्या यांमुळे क्षयरोगाचा संसर्ग वाढण्यासाठी पूरक वातावरण तयार होतं. कैद्यांना भेटायला येणाऱ्या कुटुबीयांमार्फत मग त्याचाप्रसार होतो, त्यामुळे हे अभियान मोठ्या प्रमाणावर राबवण्याची गरज या पत्रात व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे येत्या ३ फेब्रुवारीते १५ फेब्रुवारी दरम्यान राज्यांचे आरोग्य विभाग, राज्य तसंचजिल्हा

पातळीवरचे क्षयरोग निवारण अधिकारी यांच्या मदतीने कारागृहांमध्ये निःक्षय शिबिराचं आयोजन करण्यात आलं आहे.

------------------------------

वनमंत्री गणेश नाईक

वनक्षेत्राचा विकास आणि वन्य प्राण्यांचे संरक्षण याला राज्य सरकारची प्राथमिकता असल्याचे प्रतिपादन राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी नागपुरात केलं. राज्यात वनविभागाअंतर्गत डीएफओ आणि अन्न कर्मचाऱ्यांसह काही यांत्रिक सामग्रीची कमतरता असल्याचे त्यांनी मान्य करत याबाबतीची योग्य ती समीक्षा करून आगामी अर्थसंकल्पात याबद्दल प्रावधान केला जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

*पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, खानदेश या महाराष्ट्राच्या सगळ्याच डिव्हिजन मध्ये डी.एफ.ओ.आणि आर.एफ.ओ. या लेवलवर काय काय कमतरता आहे, मजुरांची कमतरता आहे, यंत्र सामग्रीची कमतरता आहे याचा आ□ावा घेतल्यानंतरच त्या गोष्टीच्या विषयी अर्थसंकल्पामध्ये त्याच्याकरता तरतूद करण्याकरता मी माननीय अर्थमंत्र्याना विनंती करणार आहे.*

याशिवाय नागपुरातील गोरेवाडा प्राणी संग्रहालयात बर्ड फ्लूमुळे वाघाचा मृत्यू झाल्या संदर्भात चंद्रपूर वरून तज्ञमंडळी ह्यांना बोलवण्यात आले आहे. याशिवाय खाद्यपदार्थांच्या तपासणीचे निर्देश देखील देण्यात आले आहे. दरम्यान या संदर्भात कुठलाही वैद्यकीय अहवाल अजून आपल्याला प्राप्त झाला नसून आपण याबद्दल माहिती घेण्यासाठी चंद्रपूरमध्ये अधिकाऱ्यांची भेट घेणार असल्याचे ते म्हणाले. दरम्यान ज्या खाद्यातून हा आजार झाल्याचा संशय आहे ते खाद्य देणे तात्पुरता थांबवण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. वन्य प्राणी संघर्ष कमी करण्यासाठी अभयारण्यातील गावांसाठी पुनर्वसन निधी लागू करण्याच्या आवश्यकतेवर त्यांनी यावेळी भर दिला.

------------------------------

आपले सरकार सेवा पोर्टल

'आपले सरकार सेवा पोर्टल'वर सध्या उपलब्ध असलेल्या ऑनलाइन सेवांचा विस्तार करण्यासाठी, राज्य सेवा हक्क आयोगानं आवश्यक पावलं उचलावीत असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. सेवा पोर्टलवर सध्या ५३६ पेक्षा जास्तसेवा उपलब्ध असून, त्याचा विस्तार केल्यावर नागरिकांना अत्यावश्यकसेवा अधिक सुलभतेने आणि कार्यक्षमतेने मिळतील असं ते यावेळी

म्हणाले. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली काल मुंबईत महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते.'आपले सरकार सेवा पोर्टल'च्या माध्यमातून ऑनलाइन सेवा देणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य असून,सरकारनं गतिशील आणि पारदर्शक प्रशासन जनतेपर्यंत पोहोचवलं आहे,असं ते म्हणाले.

-------------------------------

ऊस गाळप हंगाम

राज्यात ऊस गाळप हंगाम सुरू केलेल्या ९६ सहकारी आणि ९३ खाजगी अशा १८९ साखर कारखान्यांच्या परिसरात साक्षरता वर्ग सुरू झाले आहेत. यात आत्तापर्यंत ४ लाख ९२ हजार निरक्षरांची ऑनलाईन नोंदणी झाली आहे. साखर आयुक्तांच्या सूचनेनुसार हे वर्ग घेण्यात येत आहेत.

-------------------------------

निदर्शने

बीड जिल्हयातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर मनोज जरांगे, अंजली दमानिया आणि आ.सुरेश धस हे आक्षेपार्ह वक्तव्य करुन वंजारी समाजाची बदनामी करीत आहेत. त्यामुळे त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी आज वंजारी समाजाच्या वतीने गडचिरोली येथे निदर्शने करण्यात आली. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

-------------------------------

राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर

आदर्श आणि सुसंस्कृत समाज घडविण्यात महिलांचा मोठा वाटा आहे. समाजात संस्काराची पेरणी करण्याचे कार्य ती करीत असते. याच संस्कारातून छत्रपती शिवाजी महाराजांसारखे जागतिक किर्तीचे राजे होऊन गेले आहे. महिला शक्तीचा समाजाने सन्मान करणे आज गरजेचे आहे, असे प्रतिपादन राज्याचे गृह (ग्रामीण), शालेय शिक्षण, सहकार, गृहनिर्माण, खनिकर्म विभागाचे राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी वर्धा इथं केले. एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प पंचायत समितीच्यावतीने आयोजित महिला मेळावा प्रसंगी ते बोलत होते. मातोश्री सभागृह येथे गुरूवारी आयोजित महिला मेळाव्याचे उद्घाटन राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते पार पडले.

-------------------------------

हवामान

विदर्भात थंडीचा कडाका अद्यापही कायम आहे. नागपुरात आज सर्वात कमी आठ पूर्णांक दोन अंश सेल्सियस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली. नागपूर पाठोपाठ गोंदिया इथं आठ पूर्णांक चार, तर ब्रह्मपुरीत आठ पूर्णांक सहा, वर्धा येथे नऊ पूर्णांक सहा, तर बुल□ाणा, भंडारा, अकोला, अमरावती, यवतमाळ आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये तापमानाची नोंद करण्यात आली. वाशीम इथे 13 अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली आहे. नागपुरात सकाळच्या वेळी हुडहुडी भरवणारे बोचरे वारे वाहत असून किमान तापमानात सातत्याने घट जाणवते आहे. आगामी काही दिवस तापमान कोरडं राहणार असल्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवला आहे. दरम्यान अकोला इथं सर्वाधिक कमाल तापमान 29 अंश सेल्सिअस इतके नोंदवण्यात आलं.

------------------------------

वाचन संकल्प महाराष्ट्राचा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ.वि.भि.उपाख्य भाऊसाहेब कोलते ज्ञानस्त्रोत केंद्राच्या वतीने वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रम अंतर्गत लेखक आणि विद्यार्थी यांच्यामधील संवाद वाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल आहे. रामदासपेठ येथील इंटरनॅशनल बुद्धिस्ट स्टडीज सेंटरच्या सेमिनार हॉलमध्ये उद्या सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे भूषविणार असून लेखक डॉ.प्रदीप आगलावे, प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. राजेंद्र काकडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

-----------------------------